# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार
## क्र. रामाआ/तक्रार/१२०/२०२५/धुळे

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. दिलीप तुकाराम निकम,<br>रा.लक्ष्मीछाया अपार्टमेंट, फ्लॅट नं.११, तिसरा मजला,<br>पाथरवट लेन, शिवाजी चौक, पंचवटी,नाशिक,<br>ता.जि.नाशिक-४२२००३. | जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे,<br>सिव्हिल हॉस्पिटल समोर, साक्री रोड, धुळे, ता.जि.धुळे-<br>४२४००१. |

**सुनावणी दिनांक-१६/०७/२०२५**

तक्रारदार यांनी दि.०१/०४/२०२५ रोजीच्या अर्जान्वये "तक्रारदार यांनी दाखल केलेला माहिती अधिकाराचा अर्ज दि.१७/०२/२०२५ चा अर्जाला आजपावेतो कुठलेही उत्तर दिलेले नाही. जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द सदर अधिनियमातील कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- ची शास्तीची कारवाई करण्यात यावी. अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणून पाच लाख रुपये देणे नैसर्गिक न्याय अनुसरुन पारदर्शकता येईल." असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

सुनावणीसाठी – तक्रारदार अनुपस्थित असून तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१७/०२/२०२५ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"धुळे येथील मध्यवर्ती कारागृहाची नदी किनारी कालिका मंदिरा समोरील कुंपन भिंतीची बांधकाम अर्थ संकल्पातील तरतुदीबाबत. शासन मान्यता पत्राची प्रत कामाची मागणी बाबत. सदस्यांनी दिलेल्या पत्राची प्रत संचिका तांत्रिक कागदपत्रे व मोजमाप पुस्तिकासह प्रदान केलेल्या देयकाची साक्षांकित प्रत मूळ टिपणी टेंडरसह माहिती मिळावी. मा.उच्च न्यायालयीन क्रिमिनल अप्लिकेशन-१३७/२०२३ च्या कामकाजासाठी तात्काळ ४८ तासाच्या आत उपलब्ध करुन द्यावी."

४. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे, यांनी तक्रारदार यांचा माहिती अर्ज दि.२७/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासकीय जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग धुळे यांना वर्ग केला आहे. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सा.बां.उपविभाग, धुळे यांनी दि.३०/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आपण दारिद्रय रेषेखालील असल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक रामाआ २०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा.मंत्रालय मुंबई-३२ दि.०१/०२/२०१७ मधील अ.क्र.२ मधील १३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार माहिती विनाशुल्क पुरविण्यात याव्यात असे कळविण्यात आलेले आहे. आपण दारिद्रय रेषेखालील असल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक रामाआ २०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा.मंत्रालय मुंबई-३२ दि.०१/०२/२०१७ मधील अ.क्र.२ मधील १३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार आपल्या अर्जात मागणी केल्यानुसार या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकाच्या (ईस्टीमेटच्या) ६६ प्रति व मोजमाप पुस्तिकेच्या १४ प्रति अशा एकूण ८० प्रति या पत्राद्वारे आपणास विनाशुल्क पुरविण्यात येत आहेत. तसेच या कार्यालयात ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकाच्या व मुळ टिप्पणी टेंडरच्या प्रति या कार्यालयात उपलब्ध नाही. असे तक्रारदार यांना कळविल्याचे दिसून येते.

४. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग धुळे यांनी दि.१४/०७/२०२५ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की,

१) श्री.दिलीप तुकाराम निकम, रा.लक्ष्मीछाया अपार्टमेंट, ३ रा मजला फ्लॅट, नं.११, पाथरवट लेन, शिवाजी चौक पंचवटी, नाशिक, ता.जि.नाशिक-४२२००३(अपिलकर्ता) यांचा दि.१७/०२/२०२५ रोजीचा प्रथम अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेला असुन त्यांनी त्यांच्या अर्जात धुळे येथील मध्यवर्ती कारागृहाचे नदी किनारी कालिका मंदिरासमोरील कुंपण भिंतीच्या बांधकामाबाबत शासन मान्यता पत्र, सदस्यांनी दिलेल्या पत्राची प्रत, तांत्रिक कागदपत्रे, मोजमाप पुस्तिका, प्रदान केलेली देयके, मुळ टिप्पणी टेंडरसह माहितीची मागणी केलेली आहे.

२) श्री.दिलीप तुकाराम निकम, (अपिलकर्ता) यांच्या दि.०७/०२/२०२५ रोजीच्या अर्जान्वये त्यांना श्री. दिलीप तुकाराम निकम, हे दारिद्रय रेषेखालील असल्याने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. रामाआ-२०१६/प्र.क्र.(१७८/१६) सहा. मंत्रालय मुंबई- ३२ दि.०१/०२/२०१७ मधील अ.क्र.२ मधील १३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार या

कार्यालयात उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकांच्या (ईस्टीमेटच्या) ६६ प्रती व मोजमाप पुस्तिकेच्या १४ प्रती अशा एकूण ८० प्रती विनाशुल्क पुरविण्यात आल्या असुन ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकाच्या व मुळ टिप्पणी टेंडरच्या प्रती उपलब्ध नसल्याचे दि. ३०/०५/२०२५ मध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

३) श्री.दिलीप तुकाराम निकम,(अपिलकर्ता) यांनी प्रथम अपिल प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, धुळे यांच्या कार्यालयाकडे नकरता थेट आपल्या कार्यालयाकडे तक्रार केलेली आहे. अपिलार्थीस कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, धुळे यांचे पत्र जा.क्र.प्र.लि./१८६४/२०२५ दि.२१/०४/२०२५ अन्वये अपिल करावयाची असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, धुळे या पत्त्यावर अपिल दाखल करुन शकतात असे कळविण्यात आलेले आहे.

श्री.दिलीप तुकाराम निकम,(अपिलकर्ता) यांना त्यांच्या अर्जानुसार पत्र व्यवहार करण्यात आलेला असुन त्यांना माहितीच्या प्रती विनाशुल्क पुरविण्यात आलेल्या आहेत. तरी त्यांना आपल्या कार्यालयाकडे करण्यात आलेला तक्रार अर्ज निकाली काढण्यात यावा यासाठी शिफारशीसह सादर करण्यात येत आहे.

५. सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, धुळे यांनी सदरचा माहिती अर्ज अधिनियमातील कलम ६(३) नुसार ५ दिवसांच्या आत वर्ग करणे अपेक्षित होता परंतु त्यांनी सदरचा माहिती अर्ज विहित मुदतीत हस्तांतरीत केल्याचे दिसून येत नाही.

६. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग, धुळे यांनी अर्जदार यांना ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती देणे अपेक्षित असतांना सदरची माहिती विहित मुदतीत देण्यात आली नसल्याचे दिसून येते.

७. तक्रारदार यांचा दि.१७/०२/२०२५ रोजीचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,धुळे, यांनी विहित मुदतीमध्ये हस्तांतरीत केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

८. तक्रारदार यांच्या दि.१७/०२/२०२५ रोजीच्या माहिती अर्जास अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग,धुळे, यांनी अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविता विलंबाने दि.३०/०५/२०२५ च्या पत्रान्वये उपलब्ध माहिती पुरविल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग,धुळे, श्री.धर्मेंद्र भिवसेन झाल्टे, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,धुळे, (दि.१७/०२/२०२५ रोजी कार्यरत) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशासह प्रस्तुत तक्रार क्र.१२०/२०२५/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. 6020 दिनांक:- 18 NOV 2025